# शेळ्या-मेंढ्यांमधील प्रथमोपचार



## निंबकर कृषि संशोधन संस्था

### पशुसंवर्धन विभाग

पोस्ट बॉक्स २३
फलटण ४१५ ५२३
जि. सातारा, महाराष्ट्र.

फोन : ०२१६६ - २६२१०६
- २००७८३
ईमेल: nimsheep@gmail.com

जानेवारी २०१५

# शेळ्या-मेंढ्यांमधील प्रथमोपचार

**प्रस्तावना**

काही वेळा आजार किरकोळ असतो व वेळच्यावेळी उपचार केल्यास शेळी-मेंढी/कोकरू लवकर बरे होऊन जाते. मेंढपाळ आपल्या शेळ्या-मेंढ्यांना फार जवळून ओळखतात. त्यामुळे ते/त्या स्वतः आपल्या शेळ्या/मेंढ्यांवर उत्तमरीत्या उपचार करू शकतात. मेंढपाळांना प्राथमिक उपचाराची (प्रथमोपचार) माहिती मिळावी म्हणून ही पुस्तिका निंबकर कृषि संशोधन संस्थेने तयार केली आहे.

निंबकर कृषि संशोधन संस्था, पशुसंवर्धन विभागामार्फत ऑस्ट्रेलियन आंतरराष्ट्रीय कृषि संशोधन संस्था (ए सी आय ए आर) यांच्या साहाय्याने २००३-२०१४ सालापर्यंत स्थानिक दख्खनी जातीच्या मेंढ्यांच्या आनुवंशिक सुधारणेचा प्रकल्प राबविला गेला. ह्या प्रकल्पांतर्गत मेंढपाळांच्या कळपातील आजारी शेळ्या-मेंढ्यांचा औषधोपचारही केला जाई. वेळोवेळी ह्या मेंढपाळांना शेळ्या-मेंढ्यांचे ड्रेसिंग करणे, इंजेक्शन देणे, औषध पाजणे याबाबतची सखोल माहिती संस्थेमार्फत दिली गेलेली आहे. ही माहिती नेहमी शेळी/मेंढी पालकांच्या हाताशी असावी ह्यासाठी सोप्या भाषेतील ही पुस्तिका तयार केली आहे. प्रथमोपचाराचे हे ज्ञान शेळी/मेंढीपालक आत्मसात करून आजारांपासून होणारे नुकसान टाळतील व शेळी/मेंढीपालन अधिक किफायतशीर बनवू शकतील.

**शेळी/मेंढी पालन करणाऱ्या शेतकऱ्यांनी खालीलप्रमाणे प्रथमोपचार पेटी ठेवावी.**
**पेटीमधील साहित्य व औषधांची यादी**

### साहित्य

१. ५ मिली सिरिंज व सुई - २ नग
२. चिमटा (फोरसेप )
३. कापूस

### गोचिडा/पिसवांवरील उपचारांसाठी

१. अंगावर लावण्यासाठी बायटिकॉल
२. फवारणीसाठी ब्युटॉक्स

### गोळ्या व इतर औषधे

१. नेबलॉन पावडर
२. फेझॉल बोलस
३. कॅफलॉन पावडर
४. हिमालयन बत्तीसा
५. मॅगसल्फ पावडर
६. रेप्लान्टा पावडर

### मलमे तयार करण्यासाठी लागणाऱ्या पावडरी / तेल व बाह्य उपचारासाठी लागणारी पातळ औषधे

१. व्हॅसलीन
२. झिंक ऑक्साईड पावडर
३. गंधक पावडर
४. टरपेन्टाईन
५. वेखंड पावडर
६. करंज (कडू) तेल
७. कडुनिंब (नीम) तेल
८. जेन्शन व्हायोलेट

### इंजेक्शन

१. टेरामायसीन एल ए इंजेक्शन
२. बेलामिल/लिवामिल/बी कॉम्प्लेक्स इंजेक्शन
३. मेलेनॉक्स इंजेक्शन
४. सल्प्रिम इंजेक्शन

प्रथमोपचार पेटीमधील मलमे तयार करावी लागतात व बाकीची औषधे व साहित्य औषध विक्रेत्यांकडे मिळते.

## मलम / तेल

### १. झिंक ऑक्साईड मलम (पांढरे मलम)

कोणत्याही प्रकारच्या जखमेवर हे मलम उपयोगी आहे. जखम स्वच्छ पाण्याने धुवून संपूर्ण कोरडी करावी व हे मलम लावावे.

एक भाग झिंक ऑक्साईड व पाच भाग व्हॅसलीन मिसळून हे मलम तयार करता येते. झिंक ऑक्साईड व व्हॅसलीन औषधाच्या दुकानात विकत मिळते.

### २. गंधक मलम

हे मलम मुख्यत्त्वे नाकाडीवर उपयोगी आहे. नाकाडी बरी होईपर्यंत दररोज हे मलम लावावे.

नाकाडी झाल्यावर कौलाने घासणे ह्यासारखे अघोरी उपाय करू नयेत. कारण त्यामुळे मोठी जखम होऊन धोका संभवतो.

एक भाग गंधक, दहा भाग व्हॅसलीन किंवा कडू तेल (करंज तेल ) मिसळून हे मलम

### ३. टरपेन्टाईन तेल

ह्याचा वापर फक्त जखमेत आसाडी (अळ्या) झाल्यावरच करावयाचा आहे. आसाडी झाल्याचे दिसल्यावर थोडे टरपेन्टाईन जखमेवर ओतावे. शक्य असेल तर कापूस टरपेन्टाईनमध्ये बुडवून हा बोळा जखमेत ठेवावा. दहा मिनिटांनंतर चिमट्याच्या साहाय्याने एक एक करून अळ्या बाहेर काढाव्यात. दुसऱ्या दिवशी असाच उपचार करावा. संपूर्ण आसाडी नाहीशी झाल्यानंतर परत टरपेन्टाईनचा वापर करू नये. माशीने परत आसाडी घालू नये याकरिता कापूर व टरपेन्टाईन जखमेच्या कडेने लावावे. आसाडी संपल्यानंतर जखम बरी होईपर्यंत झिंक ऑक्साईड मलम लावून दररोज ड्रेसिंग करावे. जास्त मोठी व दुखणारी जखम असेल तर इंजेक्शन मेलेनॉक्स शेळी/मेंढीस तीन मिली व लाव्हरीस दोन मिली टोचावे. उपलब्ध असल्यास झेंडूचा किंवा सिताफळीचा पाला चेचून जखमेत भरावा अथवा कडुनिंबाच्या पाल्याचा एक चमचाभर रस जखमेत ओतून त्यावर एक कापूर वडी व तेवढीच डिकेमाली जखमेवर लावावी.

## गोळ्या व इतर औषधे

### १. नेबलॉन पावडर

ह्या पावडरचा वापर शेळी/मेंढीला पातळ संडास होत असल्यास करावा. ही पावडर डरंगळणाऱ्या शेळी/मेंढीस दररोज एक चमचा अर्धा कप पाण्यात मिसळून सलग तीन दिवस पाजावी. पावडर पाण्यातून पाजण्यासाठी शक्यतो २० मिलीच्या सिरिंजचा वापर करावा अथवा बाटलीने ठसका लागणार नाही अशा रीतीने पाजावे. जेव्हा डरंगळण्याचे प्रमाण कमी असते व नुकतीच सुरुवात झालेली असेल तेव्हा नेबलॉन पावडर जास्त प्रभावी ठरते.

डरंगळण्यावर घरगुती उपाय म्हणून शिसम झाडाचा पाला दोन मुठी वाटून त्याचा रस दिवसातून दोन वेळा पाजावा. कळकाचा पालासुद्धा डरंगळण्यावर उपाय म्हणून दिला जातो.

करडू/कोकरू किंवा शेळी/मेंढी जास्त डरंगळत असल्यास मीठ-साखर-पाणी यांचे मिश्रण दिवसातून तीन ते चार वेळा पाजावे.

### २. फेझॉल बोलस

ह्या गोळ्या करडां/कोकरांमधील तसेच मोठ्या शेळ्या/मेंढ्यांमधील डरंगळणे आटोक्यात आणण्यासाठी उपयोगी आहेत.

! मेंढीसाठी अर्धी गोळी सकाळी व अर्धी गोळी संध्याकाळी तीन दिवस.

! कोकरांसाठी पाव गोळी सकाळी, पाव गोळी संध्याकाळी तीन दिवस.

मेंढी व कोकरू जास्त अशक्त असेल तसेच पातळ संडासाचे प्रमाण नेबलॉन पावडर व फेझॉल गोळी वापरूनही कमी होत नसेल तर पुढील उपचारासाठी निंबकर कृषि संशोधन संस्थेच्या पशुसंवर्धन विभागाशी संपर्क साधावा.

### ३. कॅफलॉन पावडर

ह्या औषधाचा वापर ठसकणे बरे करण्यासाठी केला जातो. शेळी/मेंढी ठसकत असेल तर तिला कॅफलॉन पावडर व गूळ समप्रमाणात घेऊन अशा मिश्रणाचा लाडू करून चारावा. ठसकत असलेल्या शेळी/मेंढीला ही पावडर पातळ करून पाजण्याचा प्रयत्न करू नये कारण हे औषध पाजताना शेळी/मेंढी ठसकली तर हे औषध श्वासनलिकेत जाऊन शेळी/मेंढी दगावण्याचा धोका संभवतो. ठसकणाऱ्या शेळी/मेंढीस तीन ते चार दिवस उपचार करावा. कॅफलॉन व गुळाबरोबर कापराची अर्धी वडी घातल्यास त्याचा चांगला उपयोग होतो.

कॅफलॉन पावडर देण्याचे प्रमाणः

! शेळी/मेंढीसाठी तीन चमचे सकाळी व तीन चमचे संध्याकाळी.

! करडे/कोकरांसाठी एक चमचा सकाळी व एक चमचा संध्याकाळी.

### ४. हिमालयन बत्तीसा पावडर

कुचंबलेल्या शेळी/मेंढीकरिता सकाळी दोन चमचे व संध्याकाळी दोन चमचे हे औषध द्यावे. ह्या औषधाबरोबर एखाद दुसरा चमचा मॅगसल्फ दिले तरी चालते. ह्या औषधामुळे शेळी/मेंढीची भूक वाढते.

**५. मॅगसल्फ पावडर**

नुकत्याच कुचंबलेल्या व कळपातून मागे राहणाऱ्या शेळी/मेंढीसाठी ह्या औषधाचा प्रभावीपणे वापर करता येतो. ह्या औषधामुळे कोथळ्यातील चारट पुढे ढकलून पचनसंस्था मोकळी करण्याचे काम होते. पहिला चारा पोटातून बाहेर पडल्यामुळे शेळी/मेंढी चांगली चरायला लागते. हे औषध अर्धी मूठ एकदा पाजावे. औषधाचे प्रमाण जास्त झाल्यास थोडीशी पातळ संडास दिसेल त्यामुळे घाबरून जाण्याचे काही कारण नाही.

बऱ्याच वेळा जास्त लुसलुशीत हिरवा चारा खाण्यात आल्यामुळे तसेच अन्नाचे पचन न झाल्यास जनावराचे पोट फुगते व जनावराची रवंथ क्रिया थांबते. अशावेळी मॅगसल्फ पावडर एक मूठ व तिच्याबरोबर हिमालयन बत्तीसा पावडर एक मूठ एकत्र करून त्यातील अर्धा भाग सकाळी व अर्धा भाग संध्याकाळी पाण्यातून ठसका न बसेल या बेताने पाजावा.


काही वेळा पोटफुगी झाल्यास अर्धा कप गोडेतेल अर्धा कप दुधात मिसळून पाजल्याने पोटफुगी कमी होते. पोटफुगीवर घरगुती उपाय म्हणून टिचभर आल्याचा तुकडा, चार ते पाच लसूण पाकळ्या, दोन-तीन काळी मिरी दाणे एक ग्लासभर पाण्यात उकळून, गार करून पाजावे.

**६. रेप्लान्टा पावडर**

शेळी/मेंढी व्यायल्यानंतर वार न पडल्यास अथवा विताना शेळी/मेंढीस त्रास झाल्यास सकाळी दोन चमचे व संध्याकाळी दोन चमचे सलग तीन ते चार दिवस ही पावडर पाण्यात मिसळून पाजावी. शेळी/मेंढीची वार हाताने ओढण्याचे कटाक्षाने टाळावे.

## औषध पाजताना घ्यावयाची काळजी









* शेळी/मेंढीला पायामध्ये पकडून किंवा धरून ठेवावे.
* औषध पाजताना शेळी/मेंढी ठसकणार नाही याची काळजी नेहमी घ्यावी.
* एका हाताने जबडा पकडावा म्हणजे शेळी/मेंढी तोंड उघडेल. दुसऱ्या हाताने सिरिंज किंवा बाटलीचे टोक शेळी/मेंढीच्या तोंडात एका बाजूने घालावे व हळूहळू औषध तोंडात जिभेवर ओतावे.
* घट्ट औषध तोंडात घातल्यानंतर, शेळी/मेंढीने ते गिळले आहे याची खात्री करून घ्यावी.
* जनावरांच्या सर्व जातींना खाद्य आणि पाणी यात औषध मिसळून देता येते. औषधे थोड्या खाद्यात मिसळून द्यावीत. औषध मिसळलेले खाद्य खाल्ल्यानंतरच शेळी/मेंढीला उरलेले खाद्य द्यावे.
* औषध पाण्यात द्यायचे झाल्यास शेळी/मेंढी एका वेळेस पिऊ शकेल एवढ्या पाण्यात द्यावे.

रेखाटने ‘अंतरा’ संस्थेच्या सौजन्याने

## इंजेक्शन

### १. टेरामायसीन एल ए इंजेक्शन

कुचंबणे व ताप येणे यासाठी ह्या इंजेक्शनचा वापर करावा. हे इंजेक्शन स्नायूमध्ये टोचावे. शेळी/मेंढीस तीन मिली, लाव्हरीला दोन मिली व करडू/कोकरास एक मिली द्यावे. हे इंजेक्शन दिल्यानंतर इंजेक्शनच्या जागी चोळावे म्हणजे गाठ होणार नाही.

हे इंजेक्शन दिल्यानंतर एक महिना ह्या शेळ्या / मेंढ्या / करडे / कोकरांचे मटण खाऊ नये किंवा दूध पिऊ नये. कारण एक महिन्यापर्यंत ह्या औषधाचा काही अंश मटण व दुधामध्ये राहतो व तो माणसांना हानीकारक ठरू शकतो. त्याचप्रमाणे माणसांमधील जीवाणूंमध्ये ह्या औषधाला प्रतिकारशक्ती निर्माण होऊन हे औषध प्रभावहीन होण्याचा धोका संभवतो.

### २. बेलामिल/लिवामिल/बी कॉम्प्लेक्स इंजेक्शन

शेळी/मेंढी चाखत माखत खात असेल व कळपात मागे उभी राहत असेल तर ह्या इंजेक्शनपैकी जे उपलब्ध असेल त्याचा वापर करावा. हे इंजेक्शन स्नायूमध्ये टोचावे. शेळी/मेंढीस तीन मिली, लाव्हरीला दोन मिली व करडू/कोकरास एक मिली द्यावे. आजाराचे प्रमाण लक्षात घेऊन हे इंजेक्शन सलग तीन ते चार दिवस टोचावे.

### ३. मेलेनॉक्स इंजेक्शन

हे इंजेक्शन कणकण व वेदना कमी करण्यासाठी आहे. विशेषतः लंगडणाऱ्या शेळी/मेंढीच्या वेदना कमी होण्यासाठी हे इंजेक्शन द्यावे. हे इंजेक्शन स्नायूमध्ये टोचावे. मोठ्या शेळी/मेंढीस तीन मिली, लाव्हरीला दोन मिली व करडू/कोकरास एक मिली द्यावे.

### ४. सल्प्रिम इंजेक्शन

ताप असणे, कुचंबणे व डरंगळत असेल तसेच नेबलॉन पावडर व फेझॉल गोळ्या यांचा उपचार करून देखील डरंगळणे थांबत नसेल तर ह्या इंजेक्शनचा वापर करावा. हे इंजेक्शन स्नायूमध्ये टोचावे. शेळी/मेंढीस तीन मिली, लाव्हरीस दोन मिली व करडू/कोकरास एक मिली द्यावे. पहिले इंजेक्शन दिल्यावर पुढचे दोन दिवस शेळी/मेंढीस दीड मिली, लाव्हरीस एक मिली व करडू/कोकरास अर्धा मिली न चुकता टोचावे.

## गोचिड व पिसवा आटोक्यात ठेवण्यासाठी उपचार

- पावशेर खोबरेल तेलात ५० ग्रॅम वेखंडाची पावडर चांगली मिसळावी व हे तेलाचे मिश्रण स्वच्छ कापूस किंवा फडक्याने शेळी/मेंढीला गोचिडा असतील तेथे लावावे. दुसऱ्या दिवशी औषधाचा चांगला फरक पडतो व गोचिडा जातात. परंतु जास्त प्रादुर्भाव असेल तर दोन दिवसांनी गोचिडा परत येतात. गोचिडांचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात असेल तर पशुवैद्याच्या सल्ल्याने बायटिकॉल ह्या औषधाचा वापर बाहेरून लावण्यासाठी करावा.

  शेळ्या/मेंढ्यांच्या अंगाला गोचिडांचे औषध लावणार त्याच दिवशी शेळ्या-मेंढ्या वाडग्यातून किंवा बांधायच्या जागेतून बाहेर काढून वाडे फ्लेम गनने किंवा पाचट टाकून जाळावेत. जेणेकरून कानाकोपऱ्यात चिकटलेल्या गोचिडा मरतील. मात्र काडाचे/गवताचे छप्पर असेल तर जाळण्यासाठी फ्लेम गनच वापरावी.
- ब्युटॉक्स हे औषध २ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून शेळ्या/मेंढ्यांच्या अंगावर व गोठ्यात फवारणे.
- एक लिटर पाण्यात २० ग्रॅम अंघोळीच्या साबणाचे द्रावण (साबणाचा चुरा रात्रभर पाण्यात विरघळून घ्यावा), १० मिली कडुनिंब तेल आणि १० मिली करंज तेल मिसळून फवारणीसाठी औषध तयार करावे. एका शेळी/मेंढीसाठी साधारण अर्धा ते पाऊण लिटर औषध लागते. शेळ्या/मेंढ्यांच्या अंगावर औषध फवारल्यावर गोठ्यातही हे औषध फवारावे. म्हणजे शेळ्या/मेंढ्यांच्या अंगावरून गळून खाली पडलेल्या गोचिडा मरतील व पुन्हा त्यांच्या अंगावर चढणार नाहीत.

## मावा

शेळ्या/मेंढ्यांमध्ये विशेषतः करडांमध्ये अधून मधून मावा येत असतो. एकदा मावा येऊन गेल्यावर त्या कोकराला/करडाला परत मावा येत नाही. मावा आल्यावर तोंडात व ओठावर जखमा होतात. ओठावरच्या जखमांचे खपल्यात रूपांतर होते. माव्यासाठी तोंडामध्ये व ओठाला जेन्शन व्हायोलेट (शाईसारखे) औषध लावावे. लिहिण्यासाठी मिळत असलेल्या शाईचा वापर करू नये. आजारी जनावरांना मऊ लुसलुशीत चारा द्यावा. माव्यामधील जखमांना बोरोग्लिसरीन सुद्धा लावता येते.

ह्या पुस्तिकेमधील माहितीचा वापर करून शेळी-मेंढी पालक आपल्या शेळ्या-मेंढ्यांचा प्रथमोपचार करू शकतील याची खात्री आहे. तरीपण मोठ्या प्रमाणावर आजार किंवा मरतूक आढळून आल्यास नजिकच्या सरकारी पशुवैद्यकीय मदत केंद्राचा सल्ला घ्यावा किंवा निंबकर कृषि संशोधन संस्था, पशुसंवर्धन विभाग येथे संपर्क साधावा.

**हे करू नका**

- ! शेळ्या/मेंढ्यांना डागण्या देऊ नये.
- ! शेळ्या/मेंढ्यांचे कान कापू नये. शेळ्या/मेंढ्यांचे खराब रक्त निघून जाईल ही समजूत चुकीची आहे.

**हे नक्कीच करा**

शेळ्या, मेंढ्या, करडे व कोकरांना

- ! दरवर्षी आंत्रविषार लस टोचावी
- ! शेळ्या-मेंढ्यांना पी.पी.आर. (शेळ्या/मेंढ्यांमधील बुळकांडी सारख्या) रोगाचे लशीकरण नियमित करावे. एकदा लस टोचल्यानंतर हा रोग पुढील तीन वर्षे उद्‌भवत नाही. करडे / कोकरांना वयाच्या तीन महिन्यांनंतर ही लस टोचावी.
- ! शेळी/मेंढी व्यायल्यानंतर कोकराला लगेचच चीक पाजावा.
- ! इंजेक्शनच्या सुया व सिरिंज स्वच्छ पाण्याने धुवून उकळाव्यात व मगच त्याचा वापर करावा.
- ! आजारी जनावरांस मऊ, लुसलुशीत चारा द्यावा.

संस्थेमध्ये शेळ्या/मेंढ्यांची लेंडी तपासून त्यातील जंतांचे प्रमाण, जंतांची जात व जंतांच्या जातीवरून कोणते जंतनाशक औषध द्यायचे हे सांगण्याची सोय उपलब्ध आहे.

शेळ्या/मेंढ्यांमध्ये जरबा किंवा इतर रोग प्रादुर्भाव आढळल्यास संस्थेशी संपर्क साधावा.

प्रति, ..............................................................................................

..............................................................................................

..............................................................................................

भेटीच्या वेळा : सकाळी ९ ते १२
दुपारी २ ते ५

फार्म पाहण्यास येण्यासाठी शक्यतो आधी कळवून यावे.